# शासकीय औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय, रत्नागिरी (GCOP, Ratnagiri) मध्ये एम. फार्मसी प्रवेशासाठी विद्यार्थ्याचे हमीपत्र (Undertaking)

(शैक्षणिक वर्ष: २०२६-२७)

मी,

१. पूर्ण नाव: ______________________________________________

२. वडिलांचे/पतीचे नाव: ________________________________________

३. वय: _______ वर्षे

४. पूर्ण पत्ता: _____________________________________________

५. ई-मेल आयडी: ___________________________________________

६. मोबाइल क्रमांक: _________________________________________

७. **अभ्यासक्रम:** एम. फार्मसी (M. Pharmacy)

मी पुढील बाबींची शपथपूर्वक हमी/प्रतिज्ञा करत आहे की:

१. संस्थेची माहिती आणि प्रवेश क्षमता: शासकीय औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय, रत्नागिरी या संस्थेत पदव्युत्तर पदवी (एम. फार्मसी) - प्रवेश क्षमता १२ हा अभ्यासक्रम कायम स्वयंअर्थसहाय्यित (Permanently Unaided) तत्वावर आहे, याची मला पूर्ण जाणीव आहे.

२. २-अ- शिष्यवृत्तीबाबत (Scholarship): सदर अभ्यासक्रम कायम स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर सुरू असून त्याचे शैक्षणिक शुल्क निर्धारण प्रक्रिया (Fee Fixation Process) पूर्ण न झाल्यामुळे, पदव्युत्तर पदवी (एम. फार्मसी) अभ्यासक्रमाचे शैक्षणिक शुल्क महाडीबीटी (MahaDBT) संकेतस्थळावर मान्य न झाल्याने जो पर्यंत ही प्रक्रिया होत नाही तो पर्यंत मला शिष्यवृत्ती (Scholarship) मिळणार नाही, याची मला पूर्ण जाणीव आहे आणि महाविद्यालयव्दारे सदर बाबीवर पत्रव्यवहार सुरु असून त्याबाबत नियत वेळेत कार्यवाही न झाल्यास मला पूर्ण शैक्षणिक शुल्क भरावे लागेल याबद्दल माझी कोणतीही तक्रार राहणार नाही.

**किंवा**

**२-ब-** मी GPAT गुणवत्ताधारक असून मला विद्यावेतन (Stipend) अनुज्ञेय आहे. त्यामुळे मी विद्यावेतन हा पर्याय स्वीकारत असून मी शिष्यवृत्तीचा पर्यायास नकार देत आहे. महाविदयालय विदयावेतन प्रक्रियेसाठी नियत प्राधिकरणाकडे नोंदणी, हजेरी माहिती भरणे या महाविदयालयाव्दारे करावयाच्या बाबी पूर्ण करील. मात्र सदर प्राधिकरणाव्दारे विदयावेतन देण्यास कोणत्याही प्रकारे विलंब होत असल्यास महाविद्यालय जबाबदार राहणार नाही तसेच शैक्षणिक शुल्क न भरण्यासाठी विद्यावेतनास विलंब हे कारण देता येणार नाही.

३. सध्याचे शुल्क आणि स्वीकृती (Current Fee and Acceptance): एम. फार्मसी अभ्यासक्रमाचे शैक्षणिक शुल्क हे शैक्षणिक वर्ष २०२१-२२ पासून शुल्क नियामक प्राधिकरण (Fees Regulating Authority) यांचे तदर्थ शुल्क (Ad-hoc Fee) प्रमाणे निश्चित केल्याने सद्यस्थितीतील संस्थेमार्फत शैक्षणिक शुल्क रु. ८७,०००/- (अक्षरी: सत्याऐंशी हजार रुपये फक्त) मात्र घेण्यात येते, याबद्दल माझी कोणतीही तक्रार नाही.

४. शुल्काचे निर्धारण आणि पूर्वकल्पना (Fee Determination and Prior Notice): संस्थेने निश्चित केलेले शैक्षणिक शुल्क शासनाने अथवा शुल्क नियामक प्राधिकरणाने निर्धारित केलेले नाही, याची संस्थेने मला पूर्व कल्पना (Prior Notice) दिली आहे व सदर शैक्षणिक शुल्काबाबत माझी कोणतीही तक्रार नाही.

कृ.मा.पहावे.

५. भविष्यकालीन शुल्क वाढ (Future Fee Hike): सदर अभ्यासक्रम कायम स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर सुरू असल्याने शासनाने अथवा शुल्क नियामक प्राधिकरणाने शैक्षणिक शुल्कात वाढ (Increase) केल्यास, ती वाढीव रक्कम मी त्वरित भरणे बंधनकारक (I am bound to pay immediately) असेल आणि याबाबत माझी कोणतीही तक्रार राहणार नाही.

६. शैक्षणिक शुल्काची टप्प्याटप्प्याने भरणा करण्याची हमी (Fee Payment in Installments): विद्यार्थ्यांचे हित लक्षात घेता, शैक्षणिक शुल्क दोन टप्प्यात भरण्यास संस्थेने मला मुभा दिली आहे. त्यानुसार, मी प्रवेश दिनांकास पहिल्या टप्प्यातील शैक्षणिक शुल्क रु. ______________ (अक्षरी: __________________________) जमा करेन आणि उर्वरित शैक्षणिक शुल्क रु.____________ (अक्षरी: _____________________ ______________________________________) मी प्रवेश दिनांकापासून ६० दिवसांच्या आत महाविद्यालयात जमा करेन, अशी मी हमी देत आहे. विहित मुदतीत उर्वरित शुल्क न भरल्यास संस्थेचे नियमानुसार होणा-या कारवाईस पात्र राहील.

७. संशोधन मार्गदर्शकाची मर्यादा, सद्यस्थिती आणि मार्गदर्शक उपलब्धता: विद्यापीठाच्या नियमानुसार, एक अध्यापक जास्तीत जास्त सहा (०६) विद्यार्थ्यांना संशोधन मार्गदर्शक म्हणून काम पाहू शकतो. सद्यस्थितीत महाविद्यालयात अशी अर्हता धारण करणारे फक्त एक अध्यापक (One Faculty) बी. फार्मसी अभ्यासक्रमासाठी नियुक्त झाले आहेत. अशा प्रकारे एकूण १२ पैकी फक्त ०६ विद्यार्थ्यांना मार्गदर्शक उपलब्ध होऊ शकतो, परंतु उर्वरित ०६ विद्यार्थ्यांना मार्गदर्शक उपलब्ध होत नाही आणि त्यामुळे संशोधनासाठी अडचणी निर्माण होऊ शकतात, याची मला पूर्ण कल्पना आहे. मार्गदर्शक उपलब्ध न झाल्यास संशोधन कार्य वेळेत पूर्ण न होण्याची शक्यता मला मान्य आहे आणि याबद्दल माझी संस्थेकडे कोणतीही तक्रार राहणार नाही.

वरील सर्व माहिती मी माझ्या सुत्रांव्दारे प्राप्त करुन विविध स्त्रोतांमार्फत खात्री केली आहे. या सर्व बाबीवर संपूर्ण विचार विनिमय करुन मी प्रवेश स्वीकारत आहे.

ठिकाण: रत्नागिरी.
दिनांक :

(विदयार्थ्याची स्वाक्षरी)
नांव -..........................................
मोबाईल क्र. ..................................